## कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस

**पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर**
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २३० /२०२४ दि. ११/११/२०२४

### –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रात **कोळसेवाडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत **विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे अनुषंगाने शिवसेना (उबाठा) पक्षाचे १४४ कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार श्री. सुभाष गणु भोईर यांच्या प्रचारार्थ पी. अँण्ड. टी. चौक, डोंबिवली पुर्व येथे दिनांक १५/११/२०२४ रोजी सभा होणार आहे. त्यावेळी सदर** परिसरात मोठया प्रमाणात शिवसेना (उबाठा) पक्षाचे कार्यकर्ते येणार असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | १) मानपाडा रोड, शिवाजी उद्योगनगर, गांधीनगर चौक, तर्टे ऑफीस कडुन पी. अॅण्ड टी. चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **आझाद ज्युस सेंटर, श्री समर्थ रामदास स्वामी चौक** बाजुला **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने आझाद ज्युस सेंटर, श्री समर्थ रामदास स्वामी चौक येथुन उजवीकडे वळुन नांदिवली नाला मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | २) मानपाडा रोड, साईबाबा मंदिर, सागांव कडुन पी. अॅण्ड टी. चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **आशापुरा पार्क, पी. अॅण्ड टी. कॉलनी** रोड येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने आशापुरा पार्क येथुन उजवी कडे वळुन गांधीनगर अंतर्गत रस्ता, म्हात्रेनगर, सुभाष डेअरी मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ३) रॉयल इंग्लिश स्कुल कडुन पी. अॅण्ड टी. चौकाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **नवप्रतिक सोसायटी, सत्यम व्हीला** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने नवप्रतिक सोसायटी, सत्यम व्हीला येथुन फिरुन चेरानगर मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ४) नांदिवली येथून पी. अॅण्ड टी. चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **नांदिवली चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने नांदिवली नाला व नांदिवली टेकडी मार्गे इच्छित स्थळी जातील. |

सदर अधिसूचना दिनांक १५/११/२०२४ रोजी सकाळी १०:०० वा. पासुन रात्री २२:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CS CamScanner

**<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर</u>**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण

परिवहन व्यवस्थापक, कल्याण—डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

<u>प्रत</u> :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/—सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :— स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग,/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

२/— म.न.पा.कल्याण—डोंबिवली च्या संबंधीत अधिका—यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner


कल्याणकडे
कल्याण शिळ रोड
मानपाडा चौक
शिळफाटा कडे
मानपाडा रोड
भोपर, देसलेपाडा प्रवेशद्वार
डोंबिवलीकडे
सुभाष डेअरी
प्रवेश बंद
प्रवेश बंद
प्रवेश बंद
प्रवेश बंद
भोपर रोड
नांदिवली चौक
नांदिवली रोड
नांदिवली नाला
स्वामी समर्थ मठ